# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र.१४/का.७
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १२ मार्च, २०२०

संदर्भ :- १) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या ( जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम) नियम, १९९६
२) आयोगाचे आदेश क्र. रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र.१४/का.७, दि.०४/१०/२०११
३) आयोगाचे शुध्दीपत्रक क्र. रानिआ/जिपपंस-२०११/प्र.क्र.१४/का.७, दि.११/०६/२०१४
४) मा. सर्वोच्च न्यायालय, रिट याचिका (सिव्हील) क्र.१४४५/२०१९ मधील दि.१३/१२/२०१९ व दि. १८/१२/२०१९ रोजीचे निर्णय.

**प्रस्तावना :-**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के अन्वये जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुकांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविलेली आहे.

२. आणि ज्याअर्थी, वरील संदर्भाधीन क्र. १ मधील नियम ६ व नियम १० मध्ये महिला आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याबाबतची स्पष्ट तरतूद आहे. तसेच वरील संदर्भ क्र. ४ नुसार मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१३/१२/२०१९ रोजीच्या निर्णयान्वये वाशिम जिल्हापरिषद मधील निवडणूक विभाग ४१-भरजहागीर मधील महिला आरक्षणाबाबत असलेली तक्रार पडताळण्याचे आयोगास निदेश दिले होते आणि त्याबाबत नियम ६ नुसार आयोगाने घेतलेली आरक्षणाबाबतची भुमिका योग्य असल्याचा निर्वाळा दि.१८/१२/२०१९ रोजीच्या निर्णयाने दिला आहे.

आणि ज्याअर्थी, संदर्भ क्र. २ व संदर्भ क्र. ३ येथील आदेशात आरक्षण या शिर्षकाखालील परिच्छेद क्र. ७ मध्ये नियमातील तरतूद आणि मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्वाळा विचारात घेता बदल करणे अनिवार्य झाले आहे.

आणि ज्याअर्थी, जेव्हा आरक्षणाचे एक चक्र पूर्ण होते, अशा परिस्थितीत कोणती कार्यवाही करावी याबाबत संदर्भ क्र. २ मध्ये असलेली संदिग्धता दूर करुन आरक्षणाच्या धोरणाचे योग्य व तंतोतंत पालन होण्याच्या दृष्टीकोनातून आणि कोणाकडूनही चूक होऊ नये याकरिता त्याबाबत स्पष्ट तरतूद करणे आवश्यक झाले आहे.

म्हणून त्याअर्थी; भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र जिल्हापरिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९ अ (४) मधील प्राप्त अधिकारांचा वापर करुन, मी श्री. यु. पी.एस. मदान, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**आदेश.**

१) संदर्भ क्र. ३ मधील दि. ११/६/२०१४ रोजीचे आदेश अधिक्रमित करण्यात येत आहेत.

२) संदर्भ क्र. २ मधील दि. ४/१०/२०११ रोजीच्या आदेशामधील आरक्षण सदराखालील परिच्छेद क्र. ३ व ७ रद्द करण्यात येत असून त्याऐवजी खालील नवीन परिच्छेद क्र. ३ व ७ अंतर्भूत करण्यात येत आहेत. तसेच हे स्पष्ट करण्यात येत आहे की, सदर दि.४/१०/२०११ च्या आदेशातील इतर सर्व परिच्छेदांमध्ये कोणताही बदल नसून ते यापुढेही तसेच लागू राहतील.

३) आयोगाच्या दि. ४/१०/२०११ च्या आदेशातील आरक्षण या शिर्षकाखालील

<u>अ.क्र.३- "(३) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी आरक्षण</u>

याबाबत खालीलप्रमाणे टप्पे अवलंबिण्यात यावेत :-

(i) सर्व प्रथम अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीसाठी आरक्षित झालेले निवडणूक विभाग / निर्वाचक गण वगळण्यात यावेत.

(ii) तद्नंतर यापूर्वी (सन २००५ व त्यानंतरच्या) झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आलेल्या निवडणूक विभाग / निर्वाचक गण वगळण्यात यावेत.

(iii) आता उर्वरित निवडणूक विभाग / निर्वाचक गण यांची संख्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित करावयाच्या संख्येपेक्षा जास्त असल्यास, त्यामधून सोडत काढून आरक्षण निश्चित करण्यात यावे.

(iv) तथापि, क्र. (iii) मध्ये उर्वरित निवडणूक विभाग / निर्वाचक गण यांची संख्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित करावयाच्या संख्येपेक्षा कमी असल्यास,

(a) प्रथम उर्वरित सर्व निवडणूक विभाग / निर्वाचक गण नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता थेट आरक्षित करण्यात यावेत.

(b) वरील (a) प्रमाणे आरक्षण दिल्यानंतर सदर स्थानिक स्वराज्य संस्थेचे सर्व निवडणूक विभाग / निर्वाचक गणांकरिता नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या आरक्षणाचे एक चक्र संपुष्टात येते. आता उरलेल्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणाकरिता नव्याने चक्र सुरु करणे आवश्यक आहे.

(c) त्यामुळे उरलेल्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणाच्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या आरक्षणासाठी क्र. (ii) अनुसार वगळलेल्या सर्व निवडणूक विभाग / निर्वाचक गणामधून खाली दिलेल्या प्राधान्यक्रमानुसार वर्गवारी करावी.

| अ. क्र. | सन २००५ चे आरक्षण | सन २०१० चे आरक्षण | सन २०१५ चे आरक्षण | सन २०२० च्या आरक्षणाकरिता विचारात घ्यावयाचा प्राधान्यक्रम |
|---|---|---|---|---|
| १ | आहे | - | - | प्राध्यान्यक्रम क्र. - १ |
| २ | - | आहे | - | प्राध्यान्यक्रम क्र. - २ |
| ३ | आहे | आहे | - | प्राध्यान्यक्रम क्र. - ३ |
| ४ | - | - | आहे | प्राध्यान्यक्रम क्र. - ४ |
| ५ | आहे | - | आहे | प्राध्यान्यक्रम क्र. - ५ |
| ६ | - | आहे | आहे | प्राध्यान्यक्रम क्र. - ६ |
| ७ | आहे | आहे | आहे | प्राध्यान्यक्रम क्र. - ७ |

(d) प्राधान्य क्र. १ मध्ये वर्ग झालेले निवडणूक विभाग / निर्वाचक गणाची संख्या आरक्षण करण्यासाठी उरलेल्या संख्येपेक्षा कमी असल्यास ते सर्व निवडणूक विभाग / निर्वाचक गण थेटपणे आरक्षित करण्यात यावे. तथापि, ही संख्या अधिक असल्यास सदर नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे आरक्षण सोडतीने निश्चित करण्यात यावे.

याच पध्दतीने आवश्यक सर्व निवडणूक विभाग / निर्वाचक गणाच्या आरक्षणाची संख्या पूर्ण करण्यासाठी पुढील प्राधान्यातील उपलब्ध निवडणूक विभाग / निर्वाचक गणामधून आरक्षण करण्यात यावे."

४) आयोगाच्या दि. ४/१०/२०११ च्या आदेशातील आरक्षण या शिर्षकाखालील

<u>अ.क्र. ७ " (७) महिलांचे आरक्षण</u>

याबाबत खालीलप्रमाणे टप्पे अवलंबिण्यात यावेत :-

(i) महिलांचे आरक्षण चक्रानुक्रमे फिरविताना अगोदरच्या निवडणुकीमध्ये जे निवडणूक विभाग किंवा निर्वाचक गण अनुसूचित जातीच्या महिलांकरिता आरक्षित झाले असतील ते पुन्हा अनुसूचित जातीच्या महिलांकरिता आरक्षित होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(ii) अनुसूचित जमातीच्या महिलांकरिता आरक्षित झाले असतील ते पुन्हा अनुसूचित जमातीच्या महिलांकरिता आरक्षित होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(iii) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित झाले असतील ते पुन्हा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(iv) सर्वसाधारण महिलांकरिता आरक्षित झाले असतील ते पुन्हा सर्वसाधारण महिलांकरिता आरक्षित होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(v) मात्र जर आरक्षण चक्रानुक्रम फिरविताना त्याच प्रवर्गातील महिलांचे आरक्षण एखाद्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणावर पुन्हा देणे अपरिहार्य असेल, त्यावेळी वरील प्राधान्यक्रम दर्शविणारा तक्ता विचारात घेऊन त्याबाबतची पुढील प्रक्रिया अवलंबिण्यात यावी."

(यु. पी. एस. मदान)
आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) सर्व विभागीय आयुक्त
३) सर्व जिल्हाधिकारी
४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
५) **राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी.**